## पुणे महानगरपालिका
## स्थायीसमिती
## कार्यपत्रिका क्र. ५०
## सभा क्र.७६, दिनांक ०१/०३/२०२३ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक तहकूब सभा (शुक्रवार, दि. २४/०२/२०२३ रोजीची) बुधवार, दि. ०१/०३/२०२३ रोजी, दुपारी ४.०० (चार) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र.१७४४**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी व कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. १/१/२०२३ ते दि. ३१/१/२०२३ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबतमा. उपआयुक्त परिमंडळ क्र.४, यांचे जा.क्र. उआप/४/६८०५, दि. १६/२/२०२३चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.१७४५**

पुणे महानगरपालिका क्षेत्रीय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरूड बावधन या क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे जानेवारी २०२३ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/१३९७, दि. १७/२/२०२३चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**सेवक वर्गाची प्रकरणे**

**विषय क्र. १७४६**

पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग–१ ते वर्ग–३ मधील रिक्त पदे/अनुशेष कायमस्वरूपी भरणेसाठी खालील बाबींस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/१४४३, दि. २१/२/२०२३ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील दुसऱ्या टप्प्यातील आवश्यक खालील नमूद पदे व पदांची संख्या निश्चित करणेस.
   १) क्ष–किरण तज्ञ ( रेडिओलॉजिस्ट/सोनोलॉजिस्ट) (८ पदे)
   २) वैद्यकीय अधिकारी / निवासी वैद्यकीय अधिकारी (२० पदे)
   ३) उपसंचालक (प्राणीसंग्रहालय) (१ पद)
   ४) पशुवैद्यकीय अधिकारी (२ पदे)
   ५) वरिष्ठ आरोग्य निरिक्षक/ सिनिअर सॅनिटरी इन्स्पेक्टर/ विभागीय आरोग्य निरिक्षक (२० पदे)
   ६) कनिष्ठ अभियंता (विद्युत) (१० पदे)
   ७) आरोग्य निरीक्षक / सॅनिटरी इन्स्पेक्टर (४० पदे )
   ८) वाहन निरीक्षक/ व्हेईकल इन्स्पेक्टर (३ पदे )
   ९) औषधे निर्माता (१५ पदे)
   १०) पशुधन पर्यवेक्षक ( लाईव्ह स्टॉक सुपरवायझर ) (१ पद)
   ११) अग्निशामक विमोचक / फायरमन (२०० पदे)

२) दि. २१/११/२०२२ रोजीचे शासन निर्णयामधील नमूद खइझड ( इंस्टीट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन ) या संस्थेमार्फत सदर भरती प्रक्रिया राबविणेस व भरती प्रक्रियेबाबत खइझड या संस्थेबरोबर मा. अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे स्वाक्षरीने करारनामा करणेस.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १७४७**

पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या अकरा व तेवीस गावांच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या आकृतीबंधामध्ये मे. शासनास अंतिम मान्यतेसाठी सादर करावयाचे पुणे महानगरपालिका आस्थापना विभाग पदनिर्मिती सेवक मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेला तक्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१(३) नुसार मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्रवि/१४४४, दि. २१/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

<u>सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स</u>

**विषय क्र.१७४८**

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डि.पी. रस्ते व पुल खाजगी सहभागातून विकसित करणे अंतर्गत महमंदवाडी स.नं.२६,२७,३७ मधील २४ मी. डी.पी.रस्ता व कल्व्हर्ट बांधणे व महंमदवाडी स.नं. ३८,४०,४१,५५,५६ मधील ३० मी डि.पी. रस्ता विकसित करणे पीपीपी तत्वावर विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. जे.पी. एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. २२,०१,९६,५१०/– पेक्षा १०.१७% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. १९,७८,०२,५२४=९३ पर्यंत डेव्हलपमेंट क्रेडीट नोटच्या मोबदल्यामध्ये काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र. रू. ३,९६,३६,३७२/– पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ३०,२६,९५२/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. २,३१,२६०/– अशी एकूण र. रू. २४,०६,९७,१०८=९३ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा /कपात करणेस पर्यंतचा खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१३९९, दि.१७/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७४९**

सदाशिव पेठ परिसरातील खोदलेले रस्ते डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. सिद्धिविनायक कनस्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ३६,९८,०६४/– पेक्षा १८.६०% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ३०,१०,२२४=१० पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र. रू. ६,६५,६५२/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ३५,६९०/– अशी एकूण र. रू. ३७,११,५६६=१० पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार विशेष भाववाढ व सर्वसाधारण भावववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४००, दि.१७/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७५०**

येरवडा येथील हॉट मिक्स प्लान्टसाठी वायु प्रदुषण नियंत्रण प्रणाली पुरविणे व बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. शिवशंभो एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ४८,३२,९६८/– पेक्षा २९.००% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ३४,३१,४०७=२८ पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र. रू. ८,०४,९५६/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. २२,८८५/– पर्यंत अधिक लेबर सेस र.रू. २४,१६५/– पर्यंत अधिक वर्कर इन्शुरन्स र.रू. ४८,३३०/– ( असे एकूण र. रू. ४३,३१,७४३=२८ ) पर्यंत काम करणेस सदरचे तसेच सदर काम हे पोल्युशन कंट्रोल बोर्ड ने केलेल्या सुचनेप्रमाणे तातडीने करणे आवश्यक असल्याने सदर काम हे ब पाकिट उघडण्याच्या दिनांकापासून म्हणजेच दि.२९/०७/२०२२ पासून करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४०१, दि.१७/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७५१**

प्रभाग क्र. ३८ राजस सोसायटी समोरील मुख्य रस्ता पुर्नःडांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जॅगसन बिल्डकॉन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ३३,५६,०३३/– पेक्षा ३३.१०% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. २२,४५,१८६=०८ पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. ६,०४,०८६/– पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू.२३,३४७/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. १३,२८०/– (असे एकूण र.रू. २८,८५,८९९=०८ ) पर्यंत अधिक डांबरी, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४०२, दि.१७/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७५२**

प्रभाग क्रमांक २४ (क) रामटेकडी इंडस्ट्रीयल परिसरातील हिल साईट सोसायटी ते स्पेस केअर एअर फिल्टर कंपनीच्या चौकापर्यंत रस्ता सिमेंट कॉंक्रिटीकरण करून विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. यु.आर.फॅसिलिटी सर्व्हिसेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ३४,५९,४८४/– पेक्षा २६.९९% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. २५,२५,७६९=२७ पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र. रू. ४,१५,१३८/– पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू.३०,५७६/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ४२,८५०/– पर्यंत अधिक लेबर सेस र.रू. ३४,५९५/– पर्यंत अधिक वर्कर इन्शुरन्स र.रू. १७,२९७/– ( असे एकूण र. रू. ३०,६६,२२५=२७ ) पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीतील विशेष भाववाढ व सर्व साधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४०३, दि.१७/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७५३**

१५ व्या वित्त आयोगांतर्गत बिबवेवाडी रस्त्याच्या दोन्ही बाजूंचे फुटपाथ आणि सायकल ट्रॅकचे बांधकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. एस एण्ड बिल्डकॉन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ७,२७,५३,१५८/– पेक्षा १.००% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७,२०,२५,६२६=४२ पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. १,३०,९५,५६८/– पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू.८,५६,०७३/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. २,३६,६००/– ( असे एकूण र. रू. ८,६२,१३,८६७=४२) पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीतील विशेष भाववाढ व सर्व साधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४०४, दि.१७/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करावा.**

**विषय क्र.१७५४**

प्रभाग क्र.४ खराडी स.नं. २७/१० येथील ॲमेनिटी स्पेसवर प्लेसमेकींग अंतर्गत उर्वरित कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे सिद्धिविनायक एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ७५,९३,६५६/– पेक्षा २७.५६% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू.५५,००,८४४=४० अधिक जीएसटी र.रू. १३,६६,८५८/– पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.३९,२३५/– पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्राप्रमाणे व लेबर, मटेरिअल, पेट्रोल / डिझेलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशीकरारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भवन/१४०५, दि.१७/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७५५**

पुणे मनपाचे यशवंतराव चव्हाण नाट्यगृह कोथरूड येथे जुनी नादुरुस्त एअर कंडीशनिंग प्लांट बदलून नव्याने बसविणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविलीअसताआलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. सार्थक इलेक्ट्रोमेक प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे( टेंडर र.रु. १,०५ ,२४,९००.००/- अधिक १८% जी.एस.टी. र.रु. १८ ,९४,४८२.००/- असे एकूण र.रु. १,२४,१९,३८२.००/- (१८% जी.एस.टी. सह) चे पूर्वगणनपत्रक मधील निविदा र.रु. १ ,०५,२४,९००.००/- (अधिक १८% जी.एस.टी.) च्या १०.०१% कमी दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९४,७१,३५७.५१/- अधिक १८% जी.एस.टी. र.रु. १७ ,०४,८४४.३५/- असे एकूण र.रु. १,११,७६,२०१.८६/- चे (अक्षरी एक कोटी अकरा लाख शहात्तर हजार दोनशे एक रुपये सह्याऐंशी पैसे फक्त) पर्यंत काम करून घेणेस, त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ईस्टेट) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१४०७, दि.१७/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७५६**

संगमवाडी टी.पी. स्कीम फा.प्लॉट क्र. ९८ पुणे येथील पुणे महानगरपालिकेच्या वैद्यकीय ट्रस्टचे भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉ.नायडू हॉस्पिटल इमारतीमध्ये फर्निचर पुरविणे व बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ४,२०,७३,३३९/– पेक्षा २४.२५% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ३,१८,७०,५५४=२९ अधिक जीएसटी र.रू. ७५,७३,२०१/– पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भवन/१४०८, दि.१७/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७५७**

पुणे मनपाकडील टाटा कंपनीच्या कमर्शियल मोटारींना लागणारे स्पेअर पार्टस पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. मॅक्स एनर्जी सोल्युशन्स इंडिया लि.यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ५०,००,०००/– पेक्षा ३.४०% कमी ) असल्याने त्यांचेकडून काम करून घेणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ई) यांचे जा.क्र.मआ/मोवावि/१४१५, दि.२०/२/२०२३ चे पत्र.

१) पुणे मनपाकडील टाटा कंपनीच्या कमर्शियल मोटारींना लागणारे स्पेअर पार्टस पुरविणे कामी मे. मॅक्स एनर्जी सोल्युशन्स इंडिया लि. यांचेकडून टाटा मोटर्स लि. या वाहन उत्पादक कंपनीच्या वेळोवेळी बदलणाऱ्या (कमी/जादा) प्रचलित एमआरपी प्राईज लिस्टवर (–) ३.४० % डिस्काऊंटदराने एकूण र.रू. ५०,००,०००/– (अक्षरी रक्कम रू. पन्नास लाख फक्त) पर्यंत जीएसटी सहित जसजसे लागतील तसतसे आवश्यकतेनुसार खरेदी करणेस व त्याकामी त्यांचेबरोबर टेंडर अटी शर्तीनुसार करारनामा करणेस.

२) पुणे मनपाकडील टाटा कंपनीच्या कमर्शियल मोटारींना लागणारे स्पेअर पार्टस पुरविणे या निविदेचे ब पाकीट उघडलेनंतर म्हणजेच दि.१२/०१/२०२३ पासून मे. मॅक्स एनर्जी सोल्युशन्स इंडिया लि. यांचेकडून आवश्यकतेनुसार काम करून घेण्यात येत असल्याने प्रकरणी मान्यतेपूर्वी केलेल्या कामास पश्चात मान्यता मिळणेस.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७५८**

पुणे मनपाच्या परिमंडळ क्र. १ ते ३ मधील एल.पी.जी. गॅस शव दाहीन्यांमध्ये एल.पी.जी. गॅसचा पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविलीअसताआलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. मोरेश्वर एच.पी. गॅस एजन्सी यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे( पूर्वगणनपत्रक र.रु. ४९,०२,२४०.००/- मधील निविदा र.रु. ४९ ,०२,२४०.००/- च्या १.२५% कमी दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४८,४०,९६२.००/- चे (अक्षरी अठ्ठेचाळीस लाख चाळीस हजार नऊशे बासष्ठ रुपये शून्य पैसे फक्त) पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम ब पाकीट उघडलेचे दिनांक (०३/०१/२०२३) पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ईस्टेट) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१४१८, दि.२०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७५९**

वानवडी रामटेकडी येथील आदर्श कचरा प्रकल्प येथील पडलेली भिंत बांधणे व इतर स्थापत्य विषयक तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. विकास विजय कांबळे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ३३,६७,९८१/– ( जीएसटी वगळता ) पेक्षा २५.५४% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू.२५,०७,७९८=६५ अधिक १८ % जीएसटी र.रू. ६,०६,२३७/– अधिक मटेरिअल टेस्टिंग र.रू. २०,८६५/– रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ई.) यांचे जा.क्र.मआ/भवन/१४१९, दि. २०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७६०**

सन २०२२–२३ या सालाकरीता राजीव गांधी प्राणीसंग्रहालय येथे प्राण्यांच्या खाद्यासाठी म्हैसवर्गीय प्राण्यांचे मांस (बीफ) (फक्त मांडी) पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. इकबाल अहमद के. मेहतर यांचे एकच टेंडर आले (टेंडर र. रू. ३२,७८,८८०/–पेक्षा २%जास्त तडजोडीने ) असल्याने त्यांचेकडून र.रू.३३,४४,४५७=६०उपलब्ध रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उद्यान/१४२०, दि. २०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७६१**

प्रभाग क्र.१६ (स्विकृत सदस्य) पुरातन नागेश्वर मंदिर (सोमवार पेठ) येथील उर्वरित कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आर.पी.चित्रोडा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. २८,९५,३३०/– पेक्षा २% कमी तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रू.२८,३७,४२३=४०पर्यंत अधिकजीएसटी र.रू. ५,२१,१५९/– पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भवन/१४२१, दि. २०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र.१७६२**

प्रभाग क्रमांक१८ व १९ मधील नेहरू मुख्य रस्ता लडकत पेट्रोल पंप ते सेव्हन लव चौक (भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी उड्डाणपूल ) रस्ता डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.विजय लक्ष्मण यादव यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ४६,३०,२०६/– पेक्षा २०.००% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ३७,०४,१६४=८० पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. ८,३३,४३७/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ३५,६९०/– ( असे एकूण र. रू. ४५,७३,२९१=८०) पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीतील विशेष भाववाढ व सर्व साधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४२२, दि.२०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७६३**

डॉ. नायडू रूग्णालय परिसरातील आणि वॉर्ड क्र. ७ येथे विविध स्थापत्य विषयक दुरूस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या११ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. अजय बापुराव राऊत यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ४२,२५,३५०/– पेक्षा २९.८८% कमी तडजोडीने ) असल्याने त्यांचेकडून र.रू. २९,६२,८१५=४२अधिकजीएसटी र.रू. ७,६०,५६३/– अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ११,८९०/– पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट,स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्राप्रमाणे व लेबर, मटेरिअल, पेट्रोल/डिझेलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेसमान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भवन/१४२३, दि. २०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७६४**

५०९ टाटा चौक ते टाटा गार्डरूम सायकल ट्रॅक फुटपाथ विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सुनील वीर कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ४१,८१,७६५/– पेक्षा ३०.६०% कमी ) असल्याने

त्यांचेकडून र.रू. २९,०२,१४४=९१ अधिक जीएसटी र.रू. ७,५२,७१८/- पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू. ५८,३६८=६० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू. ६,५३०/- अशी एकूण र. रू. ३७,१९,७६१=५१ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४२४, दि.२०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७६५**

नव्याने समाविष्ट किरकिटवाडी , नांदेड , खडकवासला , नऱ्हे , नांदोशी, सणसवाडी गावांमध्ये विविध स्वरूपाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जॅगसन बिल्डकॉन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ६५,६८,५२५/- पेक्षा ३०.००% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४५,९७,९६७=५० अधिक जीएसटी र.रू. ११,८२,३३५=१५ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ४८,६४१/- अशी एकूण र.रू. ५८,२८,९४३=६५ अदा करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४२५, दि.२०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७६६**

डी.वाय. पाटील कॉलेज ते लोहगाव रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.प्राईड इन्फ्राप्रोजेक्ट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. १,६७,९६,६७९/- पेक्षा २८.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. १,१९,४२,४३८=७७पर्यंत काम करून घेणेस, अधिक जीएसटी र.रू. ३०,२३,४०२/- पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू. ७७,८२५/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ८५,६७५/- (असे एकूण र. रू. १,५१,२९,३४०=७७ ) पर्यंतअधिक टेंडर अटी शर्तीतील विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४२६, दि.२०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७६७**

मालधक्का चौक ते जुना बाजार ते कुंभारवाडा फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.गोविंद एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ३१,२२,६०६/- पेक्षा ३५.५०% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. २०,१४,०८०=८७पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. ५,६२,०६१/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ६०,२७२/- अशी एकूण र. रू. २६,३६,४२१=८७ पर्यंतअधिक टेंडर अटी शर्तीनुसार विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४२७, दि.२०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७६८**

प्रभाग क्र. २४ (क) रामटेकडी इंडस्ट्रीयल परिसरामधील सनलाईट सोलर कंपनी ते सुरूची फुड्स व ब्रेव्हरेज कंपनी पर्यंत रस्ता सिमेंट काँक्रिट करून विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदारमे. यु.आर.फॅसिलिटी सर्व्हिसेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ३४,५९,१२१/- पेक्षा ३१.९९% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. २३,५२,५४८=१९पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. ४,१५,०९५/- पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू. ३०,९२२/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ४२,८५०/- पर्यंत अधिक लेबर सेस र.रू. ३४,५९१/- पर्यंत अधिक वर्कर इन्शुरन्स र.रू. १७,२९६/- (असे एकूण र.रू. २८,९३,३०२=१९) पर्यंतअधिक टेंडर अटी शर्तीतील विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४२८, दि.२०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७६९**

ॲग्रीकल्चर कॉलेज चौक ते विद्यापीठ अस्तित्वातील सायकल ट्रॅक सुधारणा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. श्री. साई उद्योग यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ६२,७९,४८१/- पेक्षा २९.९९% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४३,९६,२६४=६५अधिक जीएसटी र.रू.११,३०,३०७/- पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू. ८६,४७२/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ३,६१०/- अशी एकूण र.रू. ५६,१६,६५३=६५ पर्यंत काम करून घेणेसअधिक टेंडर अटी शर्तीनुसार भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४२९, दि.२०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७७०**

लोहगाव येथे विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निलेश तरवडे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. १,१५,००,६२२/- पेक्षा २७.७८% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू.

८३,०५,७४९=२१पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. २०,७०,११२/– पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू. ८७,५५३/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ८५,६७५/– (असे एकूण र. रू. १,०५,४९,०८९=२१ पर्यंतअधिक टेंडर अटी शर्तीतील विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४३०, दि.२०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७७१**

प्रभाग क्र. २६ कोंढवा NIBM कडून क्लाउड ९ सोसायटी कडे जाणाऱ्या रस्त्याचा चड कमी करणे व रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १२ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. काशिनाथ सिताराम कुमावत यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. २,६८,८९,०००/– पेक्षा २६.८०% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. १,९६,८२,७४८/– अधिक जीएसटी र.रू. ४८,४०,०२०/– पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू. ८,६४,५०३=८२ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंगर.रू. ९५,८१५/– अशी एकूण र. रू. २,५४,८३,०८६=८२ पर्यंतअधिक टेंडर अटी शर्तीनुसार विशेष भाववाढसुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४३१, दि.२०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७७२**

अग्रसेन शाळा ते कॉमर झोन चौक पर्यंतचा २० मी रूंद डी.पी. रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. देवकर अर्थमुव्हर्स यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ५५,०४,०९१/– पेक्षा २०.१०% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४३,९७,७६८=७१पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. ९,९०,७३६=३८ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ५,१००/– (असे एकूण र. रू. ५३,९३,६०५=०९) पर्यंतअधिक टेंडर अटी शर्तीतील विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४३२, दि.२०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७७३**

लोहगाव मनपा हद्दीपासून वाघोली पर्यंत २४ मी आर.पी. रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १२ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. किरण मधुकर उंद्रे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. १,०४,१६,१२६/– पेक्षा २७.९१% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७५,०८,९८५=२३पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. १८,७४,९०३/– पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू. ९७,२८१/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ८४,४०५/– (असे एकूण र.रू. ९५,६५,५७४=२३) पर्यंतअधिक टेंडर अटी शर्तीतील विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढसुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४३३, दि.२०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७७४**

खराडी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रापासून मुंढवा जॅकवेल पर्यंत प्रक्रिया केलेले पाणी ग्रॅव्हिटी लाईनद्वारे वाहून नेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. एम.जी.माने यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ३,७४,८६,१९६/– पेक्षा १७.९१ % कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ३,०७,७२,४१८=२९ व अधिक जीएसटी र.रू. ५५,३९,०३५=२९अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ३,४५,७९५/– पर्यंत अधिक टेस्टिंग चार्जेस र.रू. ८,६२,७६९/– असे एकूण र.रू. ३,७५,२०,०१७=५८ अधिकभाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१४३४, दि.२१/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७७५**

पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट गावामधील सुस, म्हाळुंगे, बावधन बुद्रुक या ग्रामपंचायत हद्दीतील पंपींग चालविणेसाठी १ वर्षासाठी कंत्राटी पंप ऑपरेटर व बिगारी सेवक पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. जय शंकर असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ६४,०९,३९८/– पेक्षा १.००%जास्त ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ६४,७३,४९१=९८ + (अधिक किमान वेतन कायद्यानुसार विशेष भत्ता , रजावेतन, भविष्य निर्वाह निधी , बोनस इ. वेतनामध्ये होणाऱ्या बदलानुसार होणारा फरकानुसार ) मान्यता मिळणेस व बिलापोटी आवश्यक त्या वजावटी करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पाणीपुरवठा/१४३५, दि.२१/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७७६**

सुस टाकी अंतर्गत येणाऱ्या भागात टॅंकरने पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. स्वामी समर्थ वॉटर सप्लायर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ९९,९९,३५१/– पेक्षा १७.७७%कमी) असल्याने त्यांचेकडून

र.रू. ८२,२१,७६६=३७ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पाणीपुरवठा/१४३६, दि.२१/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७७७**

सुस टाकी व चतुश्रृंगी झोन अंतर्गत येणाऱ्या भागात टॅंकरने पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.संतोष वॉटर टॅंकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ९९,९९,७३७/– पेक्षा २२.००%कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७७,९९,७९४=८६पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पाणीपुरवठा/१४३७, दि.२१/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १७७८**

नव्याने समाविष्ट ११ गावांपैकी उंड्री व कार्यकारी अभियंता स्वारगेट पाणीपुरवठा क्रमांक १ अंतर्गत येणाऱ्या विविध भागात टॅंकरने पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. अमोल रमेश देवकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. २९,९९,२४९/– पेक्षा १०.०० % कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. २६,९९,३२४=१० ची निविदा मान्य करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पाणीपुरवठा/१४३८, दि.२१/७/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १७७९**

लष्कर पाणीपुरवठा विभागा अंतर्गत पुणे महानगर पालिकेतनव्याने समाविष्ट औताडे हांडेवाडी व होळकर वाडी गावात टॅंकरने पिण्याचे पाणीपुरवठा करणे सन २०२२–२३ (भाग–१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. विशाल ट्रान्सपोर्ट यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ४९,९८,३७५/– पेक्षा १०.०० % कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४४,९८,५३७=५० उपलब्ध रकमेपर्यंत करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करणेस व ब पाकीट उघडलेचे दि.२७/१२/२०२२ पासून काम सुरू करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पाणीपुरवठा/१४३९, दि.२१/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १७८०**

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडीट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. व पुल खाजगी सहभागातून विकसित करणे अंतर्गत महंमदवाडी स.नं. ३८,२६,२७,३७ मधील २४ मी. डी.पी. व कल्व्हर्ट बांधणे व महंमदवाडी स.नं. ३८,४०,४१,५५,५६ मधील ३० मी. डी.पी. रस्ता विकसित करणे करिता ( एकूण अंदाजीय पुगप र.रू. २२,०१,९६,५१०/– ) तज्ञ सल्लागार म्हणून मे. श्रीखंडे कन्स्लटंट प्रा.लि. यांची पोस्ट टेंडर ॲक्टिव्हिटीसाठी एकूण प्रकल्पीय खर्चाच्या ०.९५% या प्रमाणे नेमणूक करणेस व त्यांच्याबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पाणीपुरवठा/१४४०, दि.२१/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७८१**

प्रभाग क्र.२० कौन्सिल हॉल चौक ते हॉटेल ब्ल्यु नाईल चौक काँक्रिट रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. यशराज ग्लोबल इन्फ्राकॉन एलएलपीयांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ४६,१२,७७३/– पेक्षा ०.९९% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४५,६७,१०६=५५पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. ८,३०,२९९/– पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू. २७,९६९/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. २३,८९५/– (असे एकूण र.रू. ५४,४९,२६९=५५) पर्यंतअधिक डांबर, स्टील , सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेकपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४४१, दि.२१/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**<u>टेंडर्स न मागविता ५ (२)(२) अन्वये प्रकरणे</u>**

**विषय क्र.१७८२**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची (ड) प्रकरण ५ मधील कलम (२) २ मधील तरतुदीच्या अनुषगाने, पुणे मनपाच्या वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय येथे उद्वाहक बसविणे कामी टेंडर्स मागविलीअसताआलेल्या २ टेंडर्सपैकीठेकेदारमे. शिंडलर इंडिया प्रा. लि. यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचेअसल्याने त्यांचेकडून र.रु.१२,६७,६०२=०९ अधिक जी.एस.टी. (१८%) र.रु. २,२८,१६८=३८ असे एकूण र.रु. १४ ,९५,७७०=४७या दरानेकाम करून घेणेस ,त्यांचेशी करारनामा करणेस व झालेल्या कामाचे मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद तक्त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्तयांचे जा.क्र. मआ/विद्युत/१४१०, दि.१७/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

<u>मागील सभेचे विषय</u>

**विषय क्र.१७८३**

रस्ता सुरक्षा सुधारणा आराखड्यानुसार वाहतूक पोलिसांच्या मार्गदर्शनानुसार रस्त्यावर रस्ता चिन्हांकित चिन्हे व रहदारीच्या सुरक्षेच्या दृष्टीने तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. शिवस्वयंभू रियल्टर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. २५,९७,१५६/– पेक्षा ०.०२ % कमी दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रू. २५,९६,६३५=५७ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू. ४,६७,४८८/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू.२,४९५/– (असे एकूण र.रू. ३०,६६,६१९=५७) पर्यंत काम करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त ( वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१३२९, दि.२५/१/२०२३ चे पत्र.

(टीप– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. १७/२/२०२३ च्या सभेत ठरले होते.)

**निर्णय – सदर विषयाचा आठ दिवसांनी विचार करण्यात यावा.**

**विषय क्र.१७८४**

प्रभाग क्र.२६ मधील मोहम्मद वाडी येथील गुजर शाळा शेजारील पाझर तलाव या ठिकाणी विविध विकास कामे करणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविलीअसताआलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. सॅन वॉटर डिझाईन यांचे सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र. रु. ४७,५६,१५६/– अधिक १८ % जीएसटी र.रू. ८,५६,१०८=०८ असे एकूण र.रू. ५६,१२,२६४=०८ चे पूर्वगणनपत्रक मधील निविदा र.रू. ४७,५६,१५६/– (अधिक १८% जीएसटी) च्या तडजोडी अंती ०.०० % कमी ॲटपार दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४७,५६,१५६/– अधिक १८% जीएसटी र.रू. ८,५६,१०८=०८ असे एकूण र.रू. ५६,१२,२६४=०८ ( १८% जीएसटी सह ) चे पर्यंत काम करून घेणेस, सदरचे काम सुरू करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ईस्टेट) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१३४१, दि. ३०/१/२०२३ चे पत्र.

( टीप– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. १७/२/२०२३ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.१७८५**

मनपा शाळा इमारतीमध्ये उउद्घत कॅमेरे बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. आय सिक्युर आय टी प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुगप र.रू. ७९,९९,९९२/– मधील निविदा र.रू. ६७,७९,६५४/– (अधिक प्रचलित दरान येणारा १८ % जीएसटी ) पेक्षा ०.५०% कमी दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ६७,४५,७५५=७३ अधिक जीएसटी १८% र.रू. १२,१४,२३६=०३ असे एकूण र.रू. ७९,५९,९९१=७६ पर्यंत काम करून घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महापालिका आयुक्त (ईस्टेट) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/९१० दि. २३/११/२०२२ चे पत्र.

( टीप– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. १७/२/२०२३ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७८६**

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्ते व पुल विकसित करणे या प्रकल्पाअंतर्गत डेव्हलपमेंट क्रेडिट नोट निर्माण करणे या करिता सॉफ्टवेअर बनविणे व डेव्हलपमेंट क्रेडिट नोटची छपाई तसेच अनुषंगिक प्रिंटर खरेदी करणे (बी–२ पद्धतीची) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. न्याती टेक्नोलॉजीस प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडूनर.रु. ८२,८४,७५४/– अधिक जी.एस.टी. पर्यंत अदा करणेस / करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इस्टेट) यांचे जा.क्र. मआ/पथ/६४३,दि. २३/९/२०२२ चे पत्र.

( टीप– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. १७/२/२०२३ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय – सदर विषयाचा आठ दिवसांनी विचार करण्यात यावा.**

**विषय क्र. १७८७**

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील वाहनतळांचे बाबतीत कोवीड–१९ या साथरोगाचे कालावधीतील वार्षिक मक्ता रकमेमध्ये काही प्रमाणात सवलत मान्य करणेबाबत मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेता, मा.आबा बागुल व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. १२/४/२०२१ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १११ दि. १२/४/२०२१ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/प्रकल्प/८०७ दि.३/११/२०२१ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

( टीप– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा, असे दि.१७/२/२०२३ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय – सदर विषयाचा आठ दिवसांनी विचार करण्यात यावा.**

**विषय क्र. १७८८**

पुणे शहराच्या हद्दीमधील रस्त्यांवर विविध सेवा वाहिन्या टाकणेसाठी शासकीय संस्थांना देण्यात येणारी सवलत रद्द करणे याकरिता खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबतमा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/७११ दि.११/१०/२०२१ चे पत्र.

१. मा. मुख्य सभेने ठ.क्र. ७० दि. २२/६/२०१५अन्वये पारित केलेला ठराव निरस्तकरणेस.

२. मे.एम.एन.जी.एल., महाराष्ट्र राज्य विदयुत महामंडळ व इतर सर्व शासकीय संस्थाना रस्ता पुर्नस्थापना दरामध्ये देण्यात येणारी सवलत रद्द करून पुणे महानगरपालिकेमार्फत दरवर्षीच्या दरपत्रकानुसार वेळोवेळी निश्चित केलेल्या दराप्रमाणे दर आकारणेस.

( टीप– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा, असे दि.१७/२/२०२३ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय – सदर विषयाचा आठ दिवसांनी विचार करण्यात यावा.**

**विषय क्र.१७८९**

अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन /७१ दि. २०/५/२०२० चे पत्र.

( टीप– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा, असे दि.१७/२/२०२३ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय – सदर विषयाचा आठ दिवसांनी विचार करण्यात यावा.**

**विषय क्र. १७९०**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.

( टीप– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा, असे दि.१७/२/२०२३ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय – सदर विषयाचा आठ दिवसांनी विचार करण्यात यावा.**

**विषय क्र. १७९१**

आरोग्य कार्यालयाकडील विविध विभागामार्फत सद्याच्या आकारण्यात येणारे प्रस्तावित मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या शुल्क दरात वाढ करून प्रस्तावित केलेल्या शुल्क दि.०१/०४/२०२१ पासून आकारणीस करण्यास मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१००७ दि.२२/३/२०२१ चे पत्र.

( टीप– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा, असे दि.१७/२/२०२३ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय – सदर विषयाचा आठ दिवसांनी विचार करण्यात यावा.**

**विषय क्र. १७९२**

भूमीगत केबलसाठी आकारणी करावयाच्या मालमत्ता कराच्या धोरणाबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टिजीओ/४२२ दि.१०/८/२०२१ चे पत्र.

( टीप– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा, असे दि.१७/२/२०२३ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय – सदर विषयाचा आठ दिवसांनी विचार करण्यात यावा.**

**विषय क्र. १७९३**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यानांचे प्रवेशशुल्कामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्ठ क्र. १ मधील अ.क्र. १ ते १३ उद्यानांचे सद्य:स्थितीत असलेले प्रचलित प्रवेशशुल्क वाढवून उद्यानांचे प्रवेश शुल्क प्रस्तावित दरांप्रमाणे प्रौढांसाठी र.रु.१०/– व लहान मुलांसाठी र.रु. ५/–, मासिक पास र.रु. २००/– व विदेशी नागरिक र.रु. १००/– दैनंदिन तिकीट या प्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उदयान/१४२ दि.२९/६/२०२० चे पत्र.

( टीप– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा, असे दि.१७/२/२०२३ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय – सदर विषयाचा आठ दिवसांनी विचार करण्यात यावा.**

**विषय क्र. १७९४**

पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्रमांच्या व्यतिरिक्त नागरिक/खाजगी/सरकारी/निमसरकारी संस्था/मंडळे/मा.सभासद/लोकप्रतिनिधी इत्यादीकडून त्यांचे खाजगी कार्यक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपासाठी सजावटीकरीता त्यांचेकडून लेखी मागणी आल्यास कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम यांचे दरात खालीलप्रमाणे वाढ करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१४१ दि.२९/६/२०२० चे पत्र.

| अ.क्र. | तपशील | प्रचलित दर (र.रु.) | प्रस्तावित दर (र.रु.) |
|---|---|---|---|
| १) | पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत भाडयाने देण्यात येणाऱ्या कुंडयाचे भाडे व<br><br>अनामत रक्कम | भाडे – र.रु.१/– प्रतिकुंडी<br><br>अनामत – र.रु. १०/– | भाडे – र.रु.१००/– प्रतिकुंडी/प्रतीदिन<br><br>अनामत रक्कम र.रु. ३००/– प्रतीकुंडी |

( टीप– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा, असे दि.१७/२/२०२३ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय – सदर विषयाचा आठ दिवसांनी विचार करण्यात यावा.**

**संकीर्ण**

**विषय क्र. १७९५**

आर्थिक दुर्बल गटासाठी आरोग्य सहाय योजनेअंतर्गत परवानाधारक औषध विक्रेत्याकडून दैनंदिन स्वरूपात सर्व प्रकारच्या औषधे व इतर साहित्यांची खरेदी करणेकामी र.रू. ३ कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य /१४११, दि. २०/२/२०२३ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका RE17F121Aठेकेदारी पद्धतीने नेमलेल्या सेवकवर्गाचे वेतन (Mosquito free city) | ३ कोटी | --- |
| **नवीन सुचविलेले काम**<br>आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका,<br>७ रूग्णालये प्रस्तुतीगृहे औषधालये RE17F133A औषधे खरेदी: (बल्क पद्धतीने , मनपा सभासदांसाठी, मनपा सेवकांसाठी , आर्थिक दुर्बल गटांसाठी आरोग्य सहाय्य योजने अंतर्गत (BPL) औषधे खरेदी, साथीचे रोग नियंत्रण विविध उपाय योजनांसाठी इ.) | --- | ३ कोटी |

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १७९६**

प्र.क्र. २६ महंमदवाडी –कौसरबाग कोंढवा मधील स.नं. ११/१२ येथे क्रिडांगण विकसित करणेसाठी र.रू. ७० लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/१४१२,दि. २०/२/२०२३ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (प्रकल्प कार्यालय), नदी पुनरूज्जीवन प्रकल्प राबविणे ( झझझ/कर्ज/ अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदी व नदीकाठ विकसित करणे/ सुधारणा करणे) (CE20D219/L2-11) | ७० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम**<br>भवन विभाग<br>प्र.क्र. २६ महंमदवाडी –कौसरबाग कोंढवा मधील स.नं. ११/१२ येथे क्रिडांगण विकसित करणे | --- | ७० लक्ष |

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १७९७**

प्र.क्र. २६ (ब) महंमदवाडी –कौसरबाग तरवडे वस्ती स.नं. ९३, महंमदवाडी येथील डॉ. दादा गुजर शाळेशेजारी कै. दत्तोबा उर्फ शंकरराव तरवडे पाझर तलाव येथे संत सृष्टी उभारणेसाठी र.रू. २०० लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/१४१३, दि. २०/२/२०२३ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (प्रकल्प कार्यालय), नदी पुनरूज्जीवन प्रकल्प राबविणे ( PPP/कर्ज/ अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदी व नदीकाठ विकसित करणे/ सुधारणा करणे) (CE20D219/L2-11) | २०० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम**<br>प्र.क्र. २६ (ब) महंमदवाडी –कौसरबाग तरवडे वस्ती स.नं. ९३, महंमदवाडी येथील डॉ. दादा गुजर शाळेशेजारी कै. दत्तोबा उर्फ शंकरराव तरवडे पाझर तलाव येथे संत सृष्टी उभारणे. | --- | २०० लक्ष |

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १७९८**

पुणे महानगरपालिकेमध्ये नवीन हंगामी नियुक्त करण्यात आलेल्या १३५ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण कालावधीत दरमहाचे वेतन अदा करणेसाठी र.रू. ३ कोटी २० लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/१४१४, दि. २०/२/२०२३ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक, कर आकारणी व करसंकलन प्रमुख कार्यालय, RE11G101Aकर आकारणी व करसंकलन प्रमुख कार्यालय, १ कायम सेवक वर्ग वेतन. | २० लक्ष | --- |
| पथ विभाग, RE20 A101A पथ सुधारणा (विशेष कार्याधिकारी)क १ पथ सुधारणा (विशेष कार्याधिकारी) यांचे कार्यालय, १ कायम सेवक वर्ग वेतन. | १ कोटी | --- |
| अग्निशामन कार्यालय, RE24A101A अग्निशामक पथक<br>क आग विझविण्याचे यंत्र बंब कार्यालय<br>१ अ कायम सेवक वर्ग वेतन . | १ कोटी | --- |
| उद्यान विभाग, RE26A101A उद्याने, प्राणीसंग्रहालये, मत्स्यालय व सर्पोद्याने<br>क. उद्याने<br>१.कायम सेवक वर्ग वेतन . | १ कोटी | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम</u>**<br>सामान्य प्रशासन विभाग<br>नवीन हंगामी नियुक्त १३५ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) कर्मचारी यांचे प्रशिक्षण कालावधीत (३ महिने ) दरमहाचे वेतन अदा करणेसाठी. | --- | ३ कोटी २० लक्ष |

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १७९९**

पुणे मनपाच्या वैद्यकीय आस्थापनांकरिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे (MPCB)चे कन्सेंट टु ऑपरेट व ऑथोरायझेशनची फी अदा करणे करिता ( पुणे मनपाच्या वैद्यकीय आस्थापनांमध्ये दैनंदिन निर्माण होणाऱ्या जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता RE17E106) या अर्थशिर्षकावर वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबतमा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१४१६, दि. २०/२/२०२३ चे पत्र.

१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांचेकडून पुणे महानगरपालिकेचे विविध रूग्णालये / प्रसुतिगृहांना संमतीपत्रासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची आकारणी सन २०१२ पासून करणेत आलेची पत्र प्राप्त झाली असून त्यामध्ये पेनल्टी फीसह मागणी केलेली आहे. याबाबत मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या (परिशिष्ट–अ) तक्त्यात नमूद केलेनुसार रूग्णालये/प्रसुतिगृहे निहाय रक्कमेचा भरणा करणेस,

२) सदर रक्कमेचा मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रा सोबतच्या तक्त्यानुसार १७ रूग्णालये / प्रसुतिगृहाकरिता होणारा भरणा एकूण रक्कम रू. १,७७,०२,९३६/- ( अक्षरी- एक कोटी सत्याहत्तर लाख दोन हजार नऊशे छत्तीस फक्त ) खर्च अंदाजपत्रक सन २०२२-२३ मधील कोंढवा कत्तलखाना आधुनिकीकरण – RE17F262 या बजेटहेडवरून रक्कम रू. दोन कोटी इतकी तरतूद खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करणेस.

३) खालीलप्रमाणे अर्थशिर्षकामधून रक्कम रू. दोन कोटी वर्गीकरणाने अर्थशिर्षक पुणे मनपाच्या वैद्यकीय आस्थापनांमध्ये दैनंदिन निर्माण होणाऱ्या जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता ठए१७ए१०६ या मान्य तरतूदीमधून वर्गीकरणाने उपलब्ध होणारी र.रू. दोन कोटी मधून होणाऱ्या खर्चाची रक्कम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) च्या अधिकृत खाते क्रमांकावर रक्कम अदा करणेस

४) तसेच उर्वरित ०४ रूग्णालये/प्रसृतिगृहांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांचेकडून रक्कमेचा भरणा करणेबाबत पत्र प्राप्त झालेवर येणारी रक्कम मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद केल्या प्रमाणे अदा करणेस.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक,आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका,<br>७ क रूग्णालय प्रस्तुतीगृह औषधालय RE17F262 कोंढवा कत्तलखाना आधुनिकीकरण करणे. | २ कोटी | --- |
| **<u>सुचविलेले काम</u>**<br>आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका, सन २०२२-२०२३ RE17E106<br>पुणे मनपाच्या वैद्यकीय आस्थापनांमध्ये दैनंदिन निर्माण होणाऱ्या जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता | --- | २ कोटी |

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १८००**

पुणे महानगर परिवहन महामंडळास सन २०२१-२२ या वर्षात वितरीत केलेल्या मोफत/सवलतीचे बसपासपोटी तपासणी अंती देय ठरणारी रक्कम PMPML संस्थेस मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या र.रू ६,९६,८३,२९२/- RE58A101Bयाअर्थशिर्षकातून आदा करणेस मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१४१७, दि. २०/२/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १८०१**

मौजे सुस येथील स.नं. २२३ कळकी ओढ्यावर ३० मी. रूंदीचा कल्व्हर्ट बांधणे या कामाकरिता पुणे महानगरपालिकेच्या मुख्य अभियंता (प्रकल्प) कार्यालयाच्या सन २०२२–२०२३ मध्ये उपलब्ध प्राप्त अंदाजपत्रकीय तरतुदीमधून र.रू. १ कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/१४४२,दि. २०/२/२०२३ चे पत्र.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (प्रकल्प कार्यालय),शहरातील नदी सुधारणा कामे करणे व तदनुषंगिक कामे करणे अंतर्गत नदी पुनरूज्जीवन प्रकल्प राबविणे ( PPP/कर्ज/ अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदीवर व नदीकाठ विकसित करणे/ सुधारणा करणे) ( बजेट कोड–CE20D219/L2-11) | १ कोटी | --- |
| नवीन सुचविलेले काम<br>मुख्य अभियंता (पथ कार्यालय),<br>मौजे सुस येथील स.नं. २२३ कळकी ओढ्यावर ३० मी. रूंदीचा कल्व्हर्ट बांधणे | --- | १ कोटी |

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**सही/–xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**वृत्तांत मंजूर.**

**सही/–xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**